# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:05.06.2026** **वार:शुक्रवार**

1. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरात आणि दमणच्या दौऱ्यावर
2. भारतीय रिझर्व्ह बँक आज द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार
3. आज जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचं आयोजन आणि
4. आशिया चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारतीय मुलांच्या संघाची पाकिस्तानशी तर मुलींच्या संघाची चीनशी लढत

**<u>पंतप्रधान-गुजरात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज गुजरातमधील सुरत शहराला भेट देणार असून, रस्ते, ऊर्जा आणि औद्योगिक क्षेत्रांतील 18 हजार 800 कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार आहे. यामध्ये वडोदरा-मुंबई या द्रुतगती महामार्गाच्या महत्त्वाच्या टप्प्यांचं लोकापर्ण मोदी यांच्या हस्ते करण्यात येईल. गुजरात आणि महाराष्ट्रातील दळणवळण आणखी सुधारण्यासाठी हा महामार्ग उपयुक्त ठरणार आहे. त्यानंतर, संध्याकाळी पंतप्रधान दमणला भेट देणार असून, तिथं सुमारे 2 हजार 970 कोटी रुपयांच्या विविध प्रकल्पांचं उद्घाटन आणि भूमिपूजन त्यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्लीत व्हेनेझुएलाच्या कार्यवाहक राष्ट्रपती डेल्सी रॉड्रिग्ज यांच्याशी चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांच्या विविध मुद्दयाचा आढावा घेतला. या बैठकीत ऊर्जा, महत्त्वपूर्ण खनिजे, तंत्रज्ञान, कृषी, आरोग्य यासह अन्य क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यावर विस्तृत चर्चा झाल्याचं पंतप्रधान मोदी यांनी समाज माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>योगासन</u>**

अहमदाबादमध्ये कालपासून जागतिक योगासन अजिंक्यपद स्पर्धेला सुरुवात झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या स्पर्धेच्या उद्घाटन सत्राला दूरस्थ माध्यमातून संबोधित केलं. या स्पर्धेत सहभागी झालेल्या खेळाडूंनी 'योग 365' या मोहिमेचे जागतिक राजदूत म्हणून योगदान द्यावं असं आवाहन पंतप्रधानांनी केलं. येत्या 8 जूनपर्यंत होणाऱ्या या स्पर्धेत साठहून अधिक देशांतील 400हून अधिक स्पर्धकांनी भाग घेतला आहे.

**<u>पतधोरण</u>**

भारतीय रिझर्व्ह बँक आज आपलं द्वैमासिक पतधोरण जाहीर करणार आहे. बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा आज सकाळी पतधोरण समितीनं घेतलेले निर्णय जाहीर करतील. वाढती महागाई आणि कच्च्या तेलाच्या किमती, घसरणारे रुपयाचे मूल्य आणि संभाव्य कमकुवत मान्सून यांसारख्या आव्हानांना तोंड देण्यासाठी रेपो दरात वाढ करणे हा योग्य मार्ग ठरणार नाही. त्याऐवजी बाजारातील विपरीत परिस्थिती दूर करण्यासाठी आणि वित्तीय स्थिरतेला पाठिंबा देण्यासाठी बँक अल्प-मुदतीचे व्याजदर आणि तरलतेचे उपाय वापरू शकते, असं एसबीआयनं प्रसिद्ध केलेल्या अहवालात म्हटलं आहे.

**<u>जागतिक पर्यावरण दिन</u>**

आज पाच जून, म्हणजेच जागतिक पर्यावरण दिन. पृथ्वीवरील जीवसृष्टी वाचवण्याबाबत व्यापक जनजागृती निर्माण करण्याच्या उद्देशानं संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, 1973 पासून दरवर्षी 5 जूनला हा दिवस साजरा केला जातो. या निमित्तानं केंद्रीय पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्री भूपेंद्र यादव आणि राज्यमंत्री कीर्ती वर्धन सिंह हे, राजधानी दिल्लीतील मैदानगढी इथल्या

'नमो ऑक्सिजन पार्क'मध्ये आयोजित वृक्षारोपण कार्यक्रमात भाग घेणार आहेत. संपूर्ण देशभरात या निमित्तानं विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**पुतिन**

रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांनी रशिया आणि भारत यांच्यातील धोरणात्मक भागीदारीचं कौतुक केलं आहे. भारताने रशियाबरोबरचे सहकार्य कमी करावे यासाठी पाश्चात्य देशांकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्न निरर्थक आणि जागतिक स्थैर्यासाठी हानिकारक असल्याचे पुतिन यांनी म्हटले आहे. जगातील प्रमुख वृत्तसंस्थांच्या प्रमुखांशी संवाद साधताना ते काल बोलत होते.
यावेळी पुतिन यांनी भारताची आर्थिक प्रगती आणि स्वतंत्र परराष्ट्र धोरण यांची प्रशंसा करत भारतासोबतचे आर्थिक संबंध अधिक दृढ करण्याचा रशियाचा निर्धार असल्याचं सांगितलं. रशिया भारताकडे एक विश्वासू भागीदार म्हणून पाहतो आणि भारताचे इतर कोणत्याही देशासोबतचे द्विपक्षीय संबंध रशियासाठी नकारात्मक ठरतील असे वाटत नाही, असेही पुतिन यांनी नमूद केले.

**जयशंकर-ब्रिटन**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर आणि ब्रिटनच्या परराष्ट्र मंत्री इव्हेट कूपर यांनी काल नवी दिल्लीत भारत-युके व्हिजन 2035चा आढावा घेण्यासाठी पहिली वार्षिक बैठक घेतली. या बैठकीत दोन्ही नेत्यांनी विकास, तंत्रज्ञान, नवोपक्रम, संरक्षण, हवामान, स्वच्छ ऊर्जा आणि शिक्षण या विषयावरील प्रगतीचा आढावा घेतला. यावेळी शिक्षण मंत्रालयानं लिव्हरपूल विद्यापीठाला बंगळूरु इथं शैक्षणिक संकुल सुरू करण्यासाठी मंजुरीपत्र सुपूर्द केलं.

**अमेरिका व्यापार**

भारत आणि अमेरिकेदरम्यानच्या व्यापार करारावरील चर्चा पुढे नेण्याच्या उद्देशानं अमेरिकेचं प्रतिनिधी मंडळ भारत दौऱ्यावर होतं. या प्रतिनिधि मंडळाचा चार दिवसांचा भारत दौरा पूर्ण झाला आहे. या दौऱ्यादरम्यान व्यापार सुलभता, आयात कर, सीमा शुल्क, आर्थिक सुरक्षा आणि परस्पर हिताच्या इतर क्षेत्रांसह विविध विषयांवर रचनात्मक आणि सकारात्मक चर्चा करण्यात आली, असं वाणिज्य आणि उद्योग मंत्रालयानं सांगितलं आहे.

**विधानपरिषद-अर्ज मागे**

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघांच्या 17 जागांसाठी तसंच एका पोटनिवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा काल शेवटचा दिवस होता. अर्ज मागे घेण्याच्या प्रक्रियेनंतर राज्यातल्या सहा मतदारसंघांमध्ये उमेदवारांची बिनविरोध निवड निश्चित झाली आहे; तर अन्य ठिकाणी निवडणुकीचं चित्र स्पष्ट झालं आहे. पुणे मतदारसंघात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार श्रीकांत पाटील तसंच राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सुनील टिंगरे आणि भाजपाचे प्रदीप कंद यांनी उमेदवारी मागे घेतल्याने महायुतीचे विक्रम काकडे यांचा मार्ग मोकळा झाला आहे.

**राज्यसभा**

राज्यसभेच्या आगामी निवडणूक आणि पोटनिवडणुकीसाठी भाजपने काल आपल्या 11 उमेदवारांची नावं जाहीर केली. त्यानुसार, मध्य प्रदेशातून तरुण चुघ आणि रजनीश अग्रवाल यांना तर राजस्थानमधून डॉ. अलका गुर्जर आणि डॉ. सतीश पुनिया यांना उमेवारी देण्यात आली आहे. गुजरातमधून राजु शुक्ला, मुकेश शुक्ला, मानसिंग परमार आणि जितेंद्र मेघजी कंजरिया यांना उमेदवारी देण्यात आली आहे. राज्यसभेच्या 24 जागांसाठी ही निवडणूक येत्या 18 तारखेला होणार आहे. तर ओदिशा, महाराष्ट्र आणि तामिळनाडूमध्ये प्रत्येकी एका जागेसाठी पोटनिवडणूक होणार आहे.

**पंतप्रधान सल्लागार**

1987 च्या तुकडीचे भारतीय प्रशासकीय सेवेतील निवृत्त अधिकारी तरुण कपूर यांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सल्लागार म्हणून मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीनं एक वर्षाची मुदतवाढ मंजूर केली आहे. कपूर यांचा हा कार्यकाळ येत्या दहा जूनपासून सुरू होईल आणि तो पुढील एका वर्षाच्या कालावधीसाठी असेल, अशी माहिती कर्मचारी आणि प्रशिक्षण विभागानं दिली आहे.

**निधन-थोपटे**

महाराष्ट्राचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ कॉंग्रेस नेते अनंतराव थोपटे यांचं काल पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते 93 वर्षांचे होते. भोर मतदारसंघामधून ते सहा वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. राज्याचे शिक्षणमंत्री तसंच दुग्धविकास,

पशुसंवर्धन, यसाह अशा विविध खात्यांचे मंत्री म्हणून त्यांनी 14 वर्ष मंत्रिमंडळात काम केलं. महाराष्ट्र राज्य सहकारी दूध उत्पादक संघ अर्थात 'महानंद'च्या उभारणीमध्ये त्यांचा सिंहाचा वाटा होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अनंतराव थोपटे यांना श्रद्धांजली वाहिली आहे.

**कश्यप निधन**

लोकसभेचे माजी महासचिव आणि घटनातज्ज्ञ डॉ.सुभाष सी.कश्यप यांचं दीर्घ आजारानंतर काल नवी दिल्लीत निधन झाले. ते 97 वर्षांचे होते. त्यांनी 100हून अधिक पुस्तकं लिहिली. 1983 ते 1990 या काळात लोकसभेचे महासचिव म्हणून त्यांनी कार्यभार सांभाळला होता. एक देश एक निवडणूक घेण्याबाबत कायदेशीर आराखडा तयार करण्यासाठी माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या उच्चस्तरीय समितीचे डॉ. कश्यप हे सदस्य होते. डॉ. कश्यप यांच्या निधनाबद्दल उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र  मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी शोक व्यक्त केला आहे.

**हॉकी**

मुलांच्या 18 वर्षाखालील आशिया चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताचा सामना पाकिस्तानशी होणार आहे. जापानमध्ये काकामिगाहारा हॉकी स्टेडियममध्ये, भारतीय प्रमाण वेळेनुसार साडे तीन वाजता सामना सुरु होईल. भारतानं चीनी तैपेईवर 13-1 असा शानदार विजय मिळवत उपांत्य फेरीत प्रवेश केला. मुलींच्या 18 वर्षाखालील आशिया चषक हॉकी अजिंक्यपद स्पर्धेच्या उपांत्य फेरीत आज भारताची लढत चीनशी होणार आहे. भारतीय प्रमाण वेळेनुसार सकाळी साडे नऊ वाजता सामना सुरु होईल.

**मान्सून-आगमन**

नैऋत्य मोसमी पाऊस अर्थात मान्सूनचं काल केरळममध्ये आगमन झाल्याची अधिकृत घोषणा हवामान विभागाने केली आहे. पुढील 4 ते 5 दिवस दक्षिणेकडील राज्यांच्या बऱ्याच भागांत मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला असून, पुढच्या 2 ते 3 दिवसांतराज्याच्या काही भागांत मान्सूनच्या सरी पडण्याची शक्यताही हवामान विभागाने वर्तवली आहे.

राजधानी दिल्लीसह, पंजाब, हरियाणा, राजस्थान आणि उत्तर प्रदेशमध्ये आज वीजांसह पावसाचा अंदाज आहे. कर्नाटक, केरळम् मध्येही आज जोरदार पावसाची शक्यता आहे. तर आंध्र प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोरममध्ये आज उष्ण दमट हवामान राहील असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

# याबरोबरच  हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल , नमस्कार